# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००४

## ** निवेदन **

या निवेदनाद्वारे राज्यातील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांच्या प्रमुखांना कळविण्यात येते की, 'कौशल्य सेतू' मधील व्यवसाय विषयाचा अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देणेसाठी शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१३५/एस.डी.२, दिनांक २७ सप्टेंबर २०१८ निर्गमित करण्यात आला आहे.

उपरोक्त विषयाच्या संदर्भीय शासन निर्णयाच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पूर्वी कौशल्य सेतू अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या सर्व विद्यार्थ्यांना व त्यांच्या माध्यमिक शाळांना कळविण्यात येते की, उपरोक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने पात्र विद्यार्थ्यांना मार्च २०१९ च्या इ.१०वी प्रमाणपत्र परीक्षेकरिता ट्रान्सफर ऑफ क्रेडिटस्चा लाभ देणेसाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

१. इ.१०वी प्रमाणपत्र परीक्षेकरिता ट्रान्सफर ऑफ क्रेडिटस्चा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी इ.१०वी च्या परीक्षेला प्रविष्ठ झालेल्या माध्यमिक शाळेमार्फत राज्य मंडळाने विहित केलेल्या नमुन्यात अर्ज करुन नोंदणी करावयाची आहे. सदर विहित नमुना मंडळाच्या www.mahahsscboard.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर डाऊनलोड करुन प्रिंट काढण्यासाठी उपलब्ध आहे.

२. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पूर्वी कौशल्य सेतू अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या लाभार्थी विद्यार्थ्यांनी सदर अर्जाची प्रिंट काढून तो अर्ज दिनांक ६/०५/२०१९ ते १५/०५/२०१९ या कालावधीत परिपूर्ण व बिनचूक भरावा. सदर अर्जावर विहित जागेवर स्वत:ची स्वाक्षरी करावी. तसेच तो ज्या माध्यमिक शाळेतून अंतिमत: माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेला (इ.१०वी) प्रविष्ठ झाला आहे त्या शाळेच्या मुख्याध्यापक/प्राचार्यांची सही व शिक्का घेऊन सदर अर्ज संबंधित विभागीय मंडळात जमा करावा.

३. सदर अर्जासोबत माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) सर्व परीक्षांचे गुणपत्रक व पी.एम.के.व्ही.वाय.(कौशल्य सेतू अभियान) प्रमाणपत्र इ.च्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. सदर कागदपत्रे संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी मुळ कागदपत्रांवरुन पडताळणी करुन स्वाक्षरीसह प्रमाणित करणे आवश्यक आहे.

४. उपरोक्त अर्ज विभागीय मंडळात जमा करताना त्यासोबत प्रक्रिया शुल्क (प्रोसेसिंग फी)- रु.४०/- व गुणपत्रिका शुल्क रु.१०/- असे एकूण रु.५०/- शुल्क राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डी.डी.)/रोखीने विभागीय मंडळात जमा करावेत. धनाकर्ष विभागीय सचिव, ------ विभागीय मंडळ, -------- यांचे नावे काढण्यात यावा.

५. उपरोक्तप्रमाणे शाळांनी सदरचे अर्ज दिनांक ६/०५/२०१९ ते १६/०५/२०१९ या कालावधीत संबंधित विभागीय मंडळात जमा करावेत.

६. या विद्यार्थ्यांना शासन निर्णयातील तरतूदीनुसार कौशल्य सेतू अभ्यासक्रमाच्या एका कोर्ससाठी दोन विषयांचे याप्रमाणे विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार देय असलेल्या एक किंवा दोन विषयांसाठी (दोन भाषा व श्रेणी विषय वगळून) ट्रान्सफर ऑफ क्रेडिटस् देण्यात येतील. मात्र सदर ट्रान्सफर ऑफ क्रेडिटस् माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेतील (इ.१०वी) कोणत्या दोन विषयांसाठी (देय असलेल्या) घ्यावयाचे आहे याची निश्चिती विहित नमुन्यातील अर्जात विद्यार्थ्याने नमूद करणे आवश्यक आहे. अर्ज सादर केल्यानंतर यामध्ये कोणताही बदल करता येणार नाही.

७. प्राप्त अर्जांची छाननी करुन पात्र विद्यार्थ्यांना शासन निर्णयातील तरतूदीनुसार मंडळामार्फत गुणपत्रक व प्रमाणपत्र देण्यात येतील.

८. उपरोक्तप्रमाणे ट्रान्सफर ऑफ क्रेडिटस् दिल्यानंतरही विद्यार्थी उत्तीर्ण न झाल्यास तो उर्वरित विषयांसाठी पुनर्परीक्षार्थी म्हणून प्रविष्ठ होऊ शकेल.

९. ट्रान्सफर ऑफ क्रेडिटस् घेऊन विद्यार्थी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.१०वी) उत्तीर्ण झाल्यास पुन्हा मंडळाच्या सदर परीक्षेला नियमित अथवा पुनर्परीक्षार्थी म्हणून प्रविष्ठ होऊ शकणार नाही.

तरी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पूर्वी कौशल्य सेतू अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या सर्व लाभार्थी विद्यार्थ्यांनी शासन निर्णयातील तरतूदींचा लाभ घेण्यासाठी उपरोक्तप्रमाणे विहित कार्यपध्दतीनुसार अर्ज करावेत व संबंधित माध्यमिक शाळांनी सदर प्रकरणी वेळेत कार्यवाही करुन सहकार्य करावे.

पुणे- ४११००४
दिनांक - .५.२०१९

(डॉ.अशोक भोसले)
सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे - ०४

---

क्रमांक-पु.वि.मं./शाखा-क/ 3178
पुणे- ४११००५.
दिनांक-०६.०५.२०१९

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त शाळा,
जिल्हा-पुणे/अहमदनगर/सोलापूर

उपरोक्त प्रकटनाव्दारे सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनामध्ये नमूद केल्यानुसार आपल्या शाळेमार्फत कार्यवाही करण्यात यावी.व सदर सवलतीपासून विद्यार्थी वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी.

09/05/2019
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे ४११००५.

प्रत माहितीस्तव तथा उचित कार्यवाहीस्तव
१. मा.शिक्षणाधिकारी, जिल्हा पुणे /अहमदनगर / सोलापूर

615
6/5/19